दैनिक महामेट्रो

www.mahametronews.in

वर्ष ४ थे : अंक : १९ पुणे,मंगळवार, ९ सप्टेंबर २०२५

पाने : ४ किंमत : ३.००

RNI NO.MAHMAR2022/87390

VOL NO.04. ISSUE : 19 Pune, Tuesday, 9 September 2025

Pages : 4 PRICE : 3.00

### दिघी रोडवर ध्वनीप्रदूषण प्रकरणी गुन्हा दाखल

भोसरीतील दिघी रोड येथे ६ सप्टेंबर रोजी रात्री मोठ्या आवाजात ध्वनीप्रदूषण केल्याप्रकरणी चौघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींमध्ये प्रथमेश गवळी, आकाश गवळी, ट्रॅक्टर चालक हेमला चव्हाण आणि अर्जुन पवार यांचा समावेश आहे. फिर्याद पोलीस शिपाई सुयोग लांडे यांनी दिली.

# मलनि:सारण वाहिन्यांसाठी ४३१.३९ कोटी रूपये खर्च


## महापालिकेला 'सिव्हरेज मास्टर प्लॅन'; एक किलोमिटर लांबीच्या मलवाहिन्यांसाठी ५ कोटी ३९ लाख खर्च

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे महापालिकेचे शहर नियोजन विकास कसे उत्कृष्ट आहे. याचा नुमना केवळ शहरातील सांडपाणी किंवा मलवाहिन्यांचे जाळे पाहिल्यानंतर लक्षात येतो. गेली वीस वर्षे येथील लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांनी सांडपाण्याच्या वाहिन्या टाकण्यासाठी कोट्यवधी रूपये खर्च केले आहेत.

दरवर्षी त्याच त्याच व्यासाच्या वाहिन्या टाकायचे त्या बदल्यात कोट्यावधी रूपयांची बीले मंजूर करण्याचा प्रकार अहव्यातपणे सुरू होता. त्यानंतर २०२३-२०२४ च्या अंदाजपत्रकाव्दारे मलनि:सारण देखभाल दुरुस्ती विभागा मार्फत तयार करण्यात आलेल्या 'सिव्हरेज मास्टर प्लॅन' नुसार अपुऱ्या पडणाऱ्या अंदाजे १८० किलोमिटर लांबीच्या विविध व्यासाच्या मलवाहिन्या बदलाव्या लागणार असल्याचा साक्षात्कार महापालिकेच्या अधिकाऱ्यांना झाला.

यापैकी शहरातील ८० किलोमिटर मलनि:सारण वाहिन्यांसाठी तब्बल ४३१.३९ कोटी रूपयांची तरतूद महापालिकेने २०२४-२०२५ च्या अंदाजपत्रकात केली. याचा




सौजन्य चॅट जिपीटी प्राधिनिधीक चित्र

अर्थ एक किलोमिटर अंतरावर मलवाहिन्या टाकण्यासाठी महापालिकेला पाच कोटी ३९ लाख रूपये खर्च येणार आहे.

पुणे महापालिका व लोकप्रतिनिधी गेली दोन दशके पुणेकरांची मोठी फसवणुक करत आहे. कारण २००२ पासून ते २०२२ पर्यंत महापालिकेची चार टर्म पुर्ण झाली. या प्रत्येक टर्ममध्ये लोकप्रतिनिधींनी सांडपाणी अर्थात मलवाहिन्या टाकण्यासाठी नियोजन शून्य विकासाप्रमाणे प्रभागात दीडशे ते तीनशे मिलिमिटर व्यासाच्या वाहिन्या टाकत होते. या वाहिन्यांमध्ये गाळ साठला म्हणून दरवर्षी पुन्हा ते काढून नवीन वाहिन्या टाकल्या जात होत्या. हा नित्यक्रम गेली वीस वर्षांपासून महापालिकेत सुरू होता. यावर महापालिकेचे कोट्यावधी रूपये खर्च झाले. यामध्ये ठेकेदार व तत्कालीन नगरसेवकांचा केवळ फायदा झाला. पण शहरातील सांडपाण्याचा मास्टर प्लॅन कधी झालाच नाही. त्यामुळे उशीरा

पान ३ वर...

### उंच व सखल भागाप्रमाणे पंधरा विभाग

पुणे महापालिकेने शहरातील उंच व सखल भागाप्रमाणे पंधरा विभाग केले आहेत. त्याला एस १ ते एस १५ क्रमांक दिले आहेत. शहरातीस मलवाहिन्या किंवा सांडपाणी वाहिन्या , पावसाळी वाहिन्यांचे जाळे तयार केले गेले आहे. यामध्ये शहरातील गल्ली, बोळापासून ते अंतर्गत रस्ते, मुख्य रस्त्यांना जोडणाऱ्या या वाहिन्या आहेत. यामध्ये तीनशे, सहाशे, नऊशे, बाराशे, पंधराशे, अठराशे, चौवीसशे मिलीमिटरच्या या वाहिन्या असणार आहेत. त्यामुळे पुणे शहरात भविष्यात पावसाळ्यात पूराच्या पाण्याचा धोका होणार नसल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

### दोन वर्षांत ८८ कोटी ८५ लाख रूपये खर्च

महापालिकेने दर वर्षी मलनि:सारण देखभाल दुरूस्ती, नालेसफाई, पावसाळी वाहिन्या साफसफाईसाठी ६० कोटी रूपये खर्च करते. तर गेल्या यावर्षीच्या अंदाजपत्रकात २८ कोटी ४५ लाख रूपयांची तरतूद होती. यावर्षी तीस कोटी रूपये याचा अर्थ पावसाळ्यापूर्वी ही कामे होणे अपेक्षित होती. त्यामुळे गेल्या दोन वर्षांत महापालिकेने केवळ सांडपाणी व नाले सफाईसाठी १०० कोटी ८५ लाख रूपये खर्च केले आहेत.

> पुणे महापालिकेने 'सिव्हरेज मास्टर प्लॅन' तयार केला आहे. २०१७ पर्यंत अपुऱ्या पडणाऱ्या अंदाजे १८० किलोमिटर लांबीच्या विविध व्यासाच्या वाहिन्या बदलाव्या लागणार आहे. त्यामुळे शहरातील उंच व सखल भागाप्रमाणे एस.१ ते एस १५ पर्यंत पंधरा भाग केले आहे. यावर्षीच्या अंदाजपत्रकात ८० किलोमिटर लांबीच्या विविध व्यासाच्या मलवाहिन्यांचे काम सुरू केले आहे. त्यासाठी ४३१ कोटी ३८ लाख रूपयांची तरतूद आहे.
> – राजेद्र जाधव,
> कार्यकारी अभियंता, मलनि:सारण विभाग, पुणे महापालिका

## महत्वाचे...

### भोसरीत ध्वनीप्रदूषण प्रकरणी गुन्हा दाखल

**पुणे । प्रतिनिधी**

भोसरी शास्त्री चौक येथे ६ सप्टेंबर रोजी रात्री मोठ्या आवाजात ध्वनीप्रदूषण केल्याप्रकरणी तीन जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींमध्ये स्वप्नील बुर्डे, ट्रॅक्टर चालक गोपाळ (रा. कर्नाटक) व दर्शन ओव्हाळ यांचा समावेश असून, त्यांनी कायद्याचे उल्लंघन करून सार्वजनिक ठिकाणी कर्कश्य आवाजात ध्वनीप्रदूषण केले. फिर्याद पोलीस शिपाई आतिष मरगळे यांनी दिली असून, आरोपींना अद्याप अटक झालेली नाही.

### ध्वनीप्रदूषण प्रकरणी तिघांविरोधात गुन्हा दाखल

**पुणे । प्रतिनिधी**

भोसरीतील लोंढे आळी येथे ६ सप्टेंबर रोजी रात्री मोठ्या आवाजात ध्वनीप्रदूषण केल्याप्रकरणी तीन जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींमध्ये आर्यन सपकाळ, ट्रॅक्टर चालक गोपाळ राठोड व प्रविण सावंत यांचा समावेश आहे. त्यांनी कायद्याचे उल्लंघन करून सार्वजनिक ठिकाणी कर्कश्य आवाज निर्माण केला. फिर्याद पोलीस शिपाई आतिष मरगळे यांनी दिली असून, आरोपींना अद्याप अटक झालेली नाही.

### निगडीत तिघांविरोधात गुन्हा

**पुणे । प्रतिनिधी**

निगडीतील सुदर्शननगर येथे गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान मनाई असूनही प्रखर बीम लाईट, लेझर बीम आणि डॉल्बीचा वापर केल्याप्रकरणी तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींमध्ये मंडळ अध्यक्ष आदित्य शिंदे, यंत्रणा मालक क्षितीज शहा आणि बीम लाईट मालक सिद्धांत यादव यांचा समावेश आहे. फिर्याद पोलीस हवालदार प्रकाश गरदरे यांनी दिली असून, आरोपींना अद्याप अटक झालेली नाही.

### मोबाईल लुटला; ३२ वर्षीय युवकाची तक्रार

**पुणे । प्रतिनिधी**

तळेगाव दाभाडे येथे ३२ वर्षीय युवकाकडून दोन अज्ञात इसमांनी मोबाईल जबरदस्तीने हिसकावून नेला. फिर्यादीचा सुमारे ८,००० रुपयांचा मोबाईल लुटण्यात आला असून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

### साडेसहा लाखांचा डंपर लंपास

**पुणे । प्रतिनिधी**

हडपसर पोलीस ठाणे हद्दीत ४५ वर्षीय व्यक्तीकडे असलेला डंपर अज्ञात इसमाने लंपास केला. ४ सप्टेंबर रोजी पहाटे १२ ते सकाळी ८ दरम्यान लोखंडी रोडवर उभा ठेवलेला डंपर चोरीस गेला. वाहनाची किंमत सुमारे ६ लाख ४ हजार रुपये एवढी आहे. अलका टॉकीजवळ ८९ हजारांचे मंगळसूत्र चोरी अलका टॉल्किज चौक जवळ गर्दीचा फायदा घेत ४८ वर्षीय महिलेच्या गळ्यातील ८९००० रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र चोरी केले.पोलीस तपास सुरु आहे.





# शहराच्या मध्यवर्ती भागात ५३ हजार ४९३ गणपतींचे विसर्जन

## भाविकांकडून २० टन ४२४ किलो टन निर्माल्य गोळा

**पुणे । प्रतिनिधी**

शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या कसबा - विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालमार्फत उभारण्यात आलेल्या हौदांवर व घाटांवर एकूण १६३९१ गणपतींचे विसर्जन करण्यात आले. तसेच भवानी पेठ क्षेत्रिय कार्यालमार्फत उभारण्यात आलेल्या हौदांवर व घाटांवर एकूण १३४३३ गणपतींचे विसर्जन करण्यात आले.

बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालमार्फत उभारण्यात आलेल्या हौदांवर व घाटांवर एकूण २३६६९ गणपतींचे विसर्जन करण्यात आले असे एकूण परिमंडळ पाच चे कार्यालयाचे अंतर्गत एकूण ५३४९३ गणपतींचे विसर्जन करण्यात आले. या या दरम्यान भाविकांकडून एकूण २०.४२४ मे. टन इतके निर्माल्य गोळा करणेत आले. तदनंतर लगेचच पुणे महानगरपालिकेच्या सफाई कर्मचा-यांनी पद्दतीतील सर्व मुख्य रस्ते व अंतर्गत रस्त्यांवर साफ-सफाईस सुरुवात केली व साधारण दोन तासांमध्ये मुख्य रस्त्यांची व बहुतांश परिसराची स्वच्छता करुन घेण्यात आली.

महानगरपालिका उप आयुक्त, परिमंडळ पाच कार्यालयाच्या अखत्यारीत कसबा विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालय, भवानी पेठ क्षेत्रिय कार्यालय व बिबवेवाडी

पान ३ वर...

# पत्रकारांच्या सुरक्षेसाठी पुरेशी काळजी घेऊ : पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार

**पुणे । प्रतिनिधी**

गणेश विसर्जन मिरवणुकी दरम्यान दोन ढोल ताशा पथक यांच्याकडून पत्रकारांसोबत गैरवर्तन झाल्याचा प्रकार घडला होता. या पार्श्वभूमीवर पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या शिष्टमंडळाने पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांची सोमवारी भेट घेतली. यावेळी पत्रकार यांच्या वार्तांकनाबाबत विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. पुणे पोलीस आयुक्त यांनी पत्रकारांना वार्तांकन योग्य प्रकारे करता येईल तसेच पत्रकारांची सुरक्षा देखील राहील याची पुरेशी काळजी आगामी काळात घेऊ असे आश्वासन शिष्टमंडळास त्यांनी दिले. यावेळी पुणे श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष ब्रिजमोहन पाटील, सरचिटणीस मंगेश फल्ले, खजिनदार दिलीप तायडे यांच्यासह मोठ्या संख्येने पत्रकार उपस्थित होते.

पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितले की, विसर्जन मिरवणुकी दरम्यान ढोल ताशा पथक यांचे नियमन करण्यासाठी आगामी काळात विशिष्ट कार्यपद्धती (एसओपी) तयार केली जाईल. पथकातील

पान ३ वर...






(सौजन्य चॅट जिपीटी प्रातिनिधिक चित्र )

# पुणे महापालिकेच्या हद्दीत १२५ आयुष्मान आरोग्य मंदिर

## विरोध करणाऱ्या विरुद्ध गुन्ह्याची नोंद कराण्याचे आयुक्तांचे आदेश

**पुणे । प्रतिनिधी**

महापालिकेच्या हद्दीत १२५ आयुष्मान आरोग्य मंदिर; नागरिकांना १४ आरोग्य सुविधा देण्यात येणार आहे. आरोग्य मंदिराला विरोध करणाऱ्या विरुद्ध गुन्ह्याची नोंद कराण्याचे आयुक्तांनी आदेश दिले आहेत. आयुष्मान आरोग्य मंदिर उपक्रमाचा आढावा घेण्यासाठी महापालिका आयुक्त कार्यलयात बैठक आयोजित केले होती. यावेळी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी सांगितले.

महापालिकेत झालेल्या बैठकीत अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) पुणे एम.जे.प्रदिप चंद्रन, आरोग्य अधिकारी डॉ. निना बोराडे, सहाय्यक आरोग्य अधिकारी (एन. यु. एच. एम.) डॉ. मनिषा विनोद नाईक, नोडल अधिकारी डॉ. गणेश जगदाळे,

पान ३ वर...

# राज्यात चार नवीन कारागृह; येरवडा, हिंगोली, भुसावळ आणि गोंदिया

## येरवड्यात प्रत्येकी चार हजार क्षमतेचे दोन कारागृह, नकाशा आणि आराखडे तयार करण्याचे काम सुरु

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यातील कारागृहातील कैद्यांची संख्या वाढत असल्याने येरवड्यात प्रत्येकी चार हजार क्षमतेचे दोन नवीन कारागृह बांधले जाणार आहे. तर हिंगोली, भुसावळ आणि गोंदिया जिल्ह्यात नवीन कारागृह उभारण्यात येणार आहे. पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाकडून नवीन कारागृहे बांधली जाणार आहे. राज्य सरकारकडून नवीन कारागृहांचा नकाशा आणि आराखडे तयार करण्याचे काम सुरु आहे. या वर्ष अखेर या कारागृहाची कामे सुरु होणार आहे.

राज्यात नऊ मध्यवर्ती,२८ जिल्हा, १९ खुली आणि प्रत्येकी एक विशेष महिला




कारागृह,किशोर सुधारालय व बाल सुधारगृह अशी ६० कारागृहे आहेत. कारागृहात अधिकृत कैदी संख्या २७ हजार १८४ असताना प्रत्यक्षात ३९ हजार ६४७ कैदी शिक्षा भोगत आहेत. यामध्ये साडे सहा हजार शिक्षाधीन आणि तब्बल तीस हजार न्यायाधीन (कच्चे) कैदी वास्तव्याला आहेत.

येरवडा कारागृहात क्षमतेच्या तीन पट कैदी शिक्षा भोगत आहे.

पान ३ वर...

| नवीन कारागृह | क्षमता | जागा | खर्च |
|---|---|---|---|
| येरवडा | ४ हजार | ७५ एकर | १६३१ कोटी |
| पहिला टप्पा | | | |
| हिंगोली | ५०० | ४२ एकर | १८० कोटी |
| भुसावळ | ५०० | २० एकर | १८० कोटी |
| गोंदिया | ५०० | २१ एकर | १८० कोटी |

> येरवडा, हिंगोली, भुसावळ आणि गोंदिया नवीन कारागृह उभारणीसाठी सरकारने प्रशासकीय मान्यता दिली आहे. पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाकडून त्यासाठी सल्लागाराची नेमणूक करण्यात आली असून नकाशा आणि आराखडे तयार करण्याचे काम प्रगतीपथावर सुरू आहे.आराखडा तयार झाल्यावर शासनाला सादर केला जाईल.
> – सुहास वारके,
> अपर पोलीस महासंचालक आणि कारागृह महानिरीक्षक




# गणेश भक्तांचे मोबाईल चोरी करणाऱ्या दोन जणांना अटक

**पुणे । प्रतिनिधी**

लक्ष्मीरोड, बुधवार चौक येथे गणेश विसर्जन मिरवणुक आलेल्या गणेश भक्तांचे खिशातील मोबाईल फोन चोरी करणा-या दोनजणांना अटक केले. त्यांच्याकडे .१३ वेग-वेगळ्या कंपनीचे महागडे फोन जप्त करुन एक लाख ७८ हजार रु. कि.चा मुद्देमाल हस्तगत केले.

फरासखाना पोलीस स्टेशन हद्दीत पुणे शहरामधील मध्यवर्ती भाग बेलबाग चौक, लक्ष्मीरोड, बुधवार चौक येथे गणेश विसर्जन मिरवणुक बधण्यासाठी मोठ्या प्रमाणात भाविक येत असतात. त्यादरम्यान फिर्यादी यांचे व त्यांचे दोन मित्र यांचे खिशातील मोबाईल फोन अज्ञात व्यक्तीने चोरी केल्याबाबत फरासखाना पोलीस स्टेशन भारतीय न्याय सहिंता सन २०२३ चे कलम

पान ३ वर...